
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २५०१




REFBK-0024316
REFBK-0024316

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०९
दा. क्र. २५३१-६
काव्य प्राथ
संग्र० शाखा

संदर्भ वाङ्मय
२५०९
२४३९६
५१५८४

भटके पक्षी

मौज प्रकाशन गृह

# भटके पक्षी

मंगेश पाडगावकर

REFBK-0024316
REFBK-0024316

मौज प्रकाशन ३१९
पहिली आवृत्ती मार्च १९८४
© १९८४ मंगेश पाडगावकर

मुखपृष्ठ
वासंती मुझुमदार

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
गिरगाव, मुंबई
४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
गिरगाव, मुंबई
४०० ००४

किंमत पंचवीस रुपये

प्रा० श्री० पु० भागवत

सौ० विमल भागवत

डॉ० अशोक भागवत

यांस

प्रेमपूर्वक

# अनुक्रम

| | |
|---|---|
| भटके पक्षी | १ |
| घोडा | २ |
| हाक | ३ |
| अमिष्ट | ४ |
| एका 'मी'चे प्रेमगीत | ६ |
| काळोख | १० |
| पत्ता | १२ |
| शब्द | १४ |
| हात तुझे | १५ |
| अग्नी | १६ |
| रेषा | १७ |
| आकार | १८ |
| नाव | १९ |
| किती हळुवार | २० |
| घन वळले | २१ |
| पाऊस | २२ |
| बंगला | २३ |
| बहर | २४ |
| अस्वल | २५ |
| चांदण्यास गुणतो मी | २७ |
| तुफान | २८ |
| सतार | २९ |
| विश्वास | ३० |
| आनंदवनातले | ३१ |
| भास | ३२ |
| किंमत | ३३ |
| मोर | ३४ |

३५ त्या झपाटल्या रानात
३६ तरी
३७ मूड
३८ सर भरून
३९ प्रोफेसर
४० संवाद
४१ स्वप्नचित्र
४२ बाग
४३ वाक्य
४४ नाते
४५ कविता शब्दांची
४६ काच
४७ उकरून माती अक्षरांची
४९ रात्रभर आपण चालतो आहोत
५१ असंबद्ध पावसात
५२ काजळे ही सांज
५३ आभाळ
५४ ओळखीची सर
५५ दिवस माझे तुझे
५७ कोकरू
५८ पक्षी
५९ सात कडवी भिजलेली
६१ प्रश्न आणि उत्तर
६२ झाडे
६३ थरथर
६४ जाग
६५ घर इवले

| | |
|---|---|
| बाधा | ६६ |
| मनातल्या गाण्यावर | ६७ |
| वाटा | ६८ |
| होडी | ७१ |
| यात्रा | ७२ |
| सोबत | ७३ |
| प्रारंभ | ७४ |
| चित्र | ७६ |
| थोतांड | ७७ |
| सोनचाफ्याची सकाळ | ७८ |
| दूर दूर जाताना | ७९ |
| इथल्या साऱ्या देवळांतून | ८० |
| झाकण | ८१ |
| ग्रंथ | ८३ |
| प्रवचन | ८४ |
| कावळे | ८५ |
| ख्रिस्त | ८६ |
| अनुभव | ८८ |
| फांदी | ८९ |
| मिटून | ९० |

भटके पक्षी

# भटके पक्षी

भटके पक्षी थव्याथव्यांनी येऊन बसतात.
त्यांच्या उडण्याच्या प्रत्येक कडव्याला देशांतराचे ध्रुवपद.
ते वसतात साखळीवर वास्तवाच्या पाय न अडकवता.
त्यांची हृदये त्यांच्या पंखांत थरारत असतात.

भटक्या पक्ष्यांना लळा असतो झाडांचा, मातीचा,
गवताच्या हिरव्या समुद्राचा; पण त्यांचे पंख अटळ ठरतात.
त्यांचे प्रेम बांधीत नाही, बांधून घेत नाही.
ते आधी भटके असतात, मग पक्षी असतात.

आभाळाच्या समुद्रातून उडू लागतात जेव्हा
पंखांची शिडे उभारून हे इवलाल्या गलबतांचे थवे
तेव्हा मी हृदयात भरून घेतो त्यांचा कलकलाट,
त्यांच्या पंखांतला थडथडता उत्साह, अटळ गती.

मुंबई
३१-३-६७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## घोडा

गॉगल लावलेला एक रिकेटी घोडा
खिडकीजवळ उभा असतो
आयाळ झडून गेलेल्या एकटेपणात :
जबड्यावरून असते लोळत लाळेची तार;
अपार आसक्ती असते पुढ्यातल्या गवताची
जे नाही पचवता येत अशक्त जठराला;
रवंथ करीत असतो अंतर्मनातला काळोख.

नसण्यात उभा असल्यासारखा असतो घोडा
माझ्या खिडकीजवळ. कधी तोंड घालतो
खिडकीतून आत : तरी त्याचा गॉगल
पडत नाही खाली हे एक आश्चर्यच !
माझ्याजवळ आणतो जबडा लाळतारेचा,
सुखावतो माझ्या शिसारीने. विचारतो
लाळेत भिजलेल्या ओशट शब्दांनी कुचकटपणे :
" कसे काय कैलासवासी कवी !
कधी घालणार आपल्या काव्याच्या श्राद्धाचे भोजन ? "

मी बघतो घोड्याकडे असह्य शिसारून
पण दिसत नाहीत त्याचे डोळे
गॉगलच्या अंधारात हरवलेले...

मुंबई
७–३–६५

## हाक

गूढ निळी घनराई
अन् टपोर चंद्र वरी,
घालित मी हाक तुला
तू नाहिस जवळ तरी.

गूढ निळी मनराई :
हाक तुला आत आत,
तुजसाठी रात्र जडे
डोळ्यांतिल बाहुल्यांत.

हाकेवर चंद्र असा,
हाकेवर रात्र अशी,
तू नसुनी जवळ कशी
डोळ्यांवर पापणिशी!

मुंबई
५–७–६५

# भ्रमिष्ट

काळी फुंकर उडवील मला टरफलासारखी
शून्याच्या कोपऱ्यात किंवा नेईल फरफटत
काळोखाचे कुबड असलेल्या वळणावरून
तेव्हा कोणालाच नसेल खबर माझ्या
डोळ्यांतल्या प्रकाशाची नासलेल्या दह्यासारख्या.

बाहेरच्या दरवाजावर टांगली आहे पिशवी,
पाववाल्या एक पाव कमी टाक तिच्यात.

अडीच हजार व्याज येईल मिस्टर!

मनातल्या मनात दहादा झोपलो तिच्याबरोबर.

छळ झाला तर झाला...झक मार.

मी एकदा नाय् दहादा लाथ मारीन नोकरीवर
पण आपल्या स्वाभिमानाची किंमत...

काळी फुंकर बुडवील मला
अपार लाटांत काळोखाच्या.
मग मी नसेन. फुटलेला
बुडबुडा मग नसेल.
असेल फक्त
काळोखात बुडालेले
काळोखाचे पाणी.

देशासाठी प्रत्येकाने त्याग...(खड्डयात जा.)
समाजाच्या संकटकाळी लेखकांनी...(चोर लेकाचे.)
एऽ तुला इंटरेस्टच नाय् आमच्यात...(बोंबलत जा.)

काळी फुंकर उडवील मला टरफलासारखी
तेव्हा मुंग्या येतील अहंकाराला,
घोकलेल्या अध्यात्माचे नाक बसेल :
श्वास नाही घेता येणार.
अज्ञाताच्या स्टेशनवर एकटाच मी
आणि भोवती मुंग्या आलेला काळोख...

मुंबई
२८-११-६५

## एका ‘ मी ’चे प्रेमगीत

डिसेंबरचे थंड दिवस :
मी गरम डोक्याने हिंडणारा
एकाकी रस्त्यांवरून
एकटा...एकटा...
एकटक पहात जुन्या आठवणींकडे,
ओढीत सर्दाळलेल्या सिग्रेटी.

रस्त्यावर विस्कटलेली सुकली पाने,
बुटांनी चिरडलेली सिग्रेटची थोटके,
बागेच्या कडेचे बर्फगार रेलिंग,
कुठेसा दूर
फाटून गेलेला धूर.

डोळे भरून आलेले.
जाड काचेच्या चष्म्यातून
धुके दिसले. धुके डोळ्यांत.
धुके बाहेर...
एकदा अशाच थंडीत
माझ्या डोळ्यांवरचा चष्मा काढून
तिने विचारले होते :
“ मी कशी दिसते ? ”
मी म्हटले :
“ धुक्यासारखी. धुक्याची. धुक्यातून. ”
आता या क्षणी असेल ती
कुठेतरी हनीमूनच्या धुक्यात
त्याच्या डोळ्यांवरचा चष्मा काढून
त्याला विचारीत तोच प्रश्न.

धुके डोळ्यांत,
धुके बाहेर,
धुके सर्वत्र,
आत्माही धुकेच.

लघ्वीला लागली जोरात.
विचित्रच हे आयुष्य सगळे :
कडेलोटाच्या तीव्र क्षणीही
लघ्वीला लागतेच.

अधूनमधून दिसणारी माणसे :
धुके भरलेल्या पोकळींसारखी.
आणि हे शहर :
धुके भरलेली प्रचंड पोकळी.
मीही धुके भरलेली प्रचंड पोकळी
धुक्यातून चालणारी,
धुक्याकडे चालणारी.

ओरडून म्हणालो मनातल्या मनात :
हा देश सोडून जाईन दूर दूर...
मग आठवले :
माझ्या कलावंत खिशात
फक्त एक रुपया नऊ पैसे.
धुके डोळ्यांत. धुके बाहेर.
धुके सर्वत्र. आत्माही धुकेच.
एक रुपया नऊ पैसे
ते मात्र धुके नव्हेत.

त्याचा पगार खरा होता,
तिच्या आकांक्षा खऱ्या होत्या,
माझ्यावरचे तिचे प्रेम
तेही (म्हणे) खरे होते.

आणि तिने एक दिवस
उपजत ज्ञानपूर्वक
आत्मविचार केला.
मला म्हणाली :
"माफ कर,
आपले काही जमणार नाही.
मला माझे स्वातंत्र्य हवे.
उगीच हळवा होऊ नको.
बी ब्रेव्ह. पुढे जा."
मी पहात राहिलो ती जाताना :
धुक्यासारखी. धुक्याची. धुक्यातून.

बी ब्रेव्ह!
अवश्य होईन.
सामर्थ्याने कलेच्या
हलवीन सगळे जग.
अलोट कीर्ती, अलोट पैसा,
सगळे मिळवीन.
पुन्हा लघ्वीला लागली जोरात :
थंडीच्या दिवसांत ही एक कटकट
सुटत नाही मागची.

गारठलेला अंधार भोवती.
काळोखातून डोके वर काढणारे
लुकलुकणारे दिवे अंधुक.
झाडे अनोळखी अनोळखी.
घरे अनोळखी अनोळखी.

तशात भूक लागली :
कडेलोटाच्या तीव्र क्षणीही
सुटत नाहीत ही लचांडे मागची.

एक चाय. दो मस्कास्लाईस.
एक चारमिनार पाकीट.

धुके डोळ्यांत.
धुके बाहेर.
धुके सर्वत्र.
आत्माही धुकेच.

मुंबई
२–१–६६

# काळोख

प्रत्येक फुलाचा एक काळोख असतो
लवलवणाऱ्या पाकळ्यांच्या प्रदर्शनापल्याड :
आणि जगणे म्हणजे असतो एक प्रयत्न
आत्मा पोखरणारा काळोख टाळीत पळण्याचा.

गण्या गणपुले समजला मनात बायकोचे लफडे,
निदान तसे त्याला वाटले. चोरून पत्रे लिहीत
असेल ? चोरून पत्रे येत असतील ? खरे असेल ?
खोटे असेल ? गण्या गणपुलेच्या मनाचा
भुगा भुगा करून टाकणारा एक काळोख.

सुशीला सोनटक्के भिते आपल्या थंडपणाला.
नवरा चिडचिडतो. आपण नाही याला पुरी पडणार.
गुप्तपणे सारखा द्वेष करीत रहाते त्याचा
अधिकच थंड होऊन. लपवून ठेवते काळोख.

लखू लाटकरला वाटत रहाते धास्ती
आपले पौरुष नबळे होत असल्याची.
सारखे अश्लील बोलत रहातो बदाबदा
मनातला काळोख लपवण्यासाठी.

बाबू बारटक्केला ठाऊक आहे, ठाऊक आहे
मुलगी आपलीच. आपल्याच रक्ताची.
पण नाव लावते दुसऱ्याचे बाप म्हणून.
तडफडतो. शरमतो. असहाय्य होतो.
खूप यश मिळवतो काळोख लपवण्यासाठी.
नजरेला धार काढून ठेवतो बेदरकार तुच्छतेची.

एक काळोख आणि दोन काळोख.
आणि तीन काळोख. आणि हजार.
आणि लाख काळोख. अब्ज, निखर्व काळोख.

मुंबई
२–४–६६

# पत्ता

ही आमची नवी मोटार,
रंग तिचा काळाभोर.
आणि हा नवा फ्रिज.
आणि हा गालिचा.
आणि हे नवे कपाट.

अहो, ते आपले हे कुठाय्‌त?
मेले ते ठाऊक आहे,
राख झाली ते ठाऊक आहे,
पण ते कुठाय्‌त हो?
ठाऊक नाही कुठाय्‌त?
तरी पण ते कुठाय्‌त हो?

हा आमचा नवा परंतू.
आणि हा रेशमी आणि.
हा फॉरिन मेकचा वगैरे.
हा कॉस्टली कलग.

आजोबा, परवचेचा कंटाळा येतो.
बे एके बे, बे दुणे चार.
काल तेच, आज तेच.
त्याच त्याच आकड्यांचा
तोच तोच पिंजरा.
आजोबा, मरण म्हणजे काय हो?
तुम्हीसुद्धा मरणार?
मीसुद्धा मरणार?
गायसुद्धा मरणार?
मरायचे नसले तरी मरणार?

काळोख फार झालाय आजोबा.
मी दिवा लावू का आजोबा?

मी एक नवा अ आणीन.
मी एक नवा ब आणीन.
मी एक नवा क आणीन.
मी एक नवा ड आणीन.

आजोबा, तुम्ही कुठे आहा?
तुम्ही सध्या कुठे आहा?
तुमचा पत्ता ठाऊक नाही.
तिथे पोस्टमन नसतो.
तिथे तार पोचत नाही.
तुमचा पत्ता कुणालाच ठाऊक नाही.

ही आमची नवी मोटार.
कुठाय्‌त हो? हे नवे घर.
आजोबा, तुम्ही कुठे आहा?
अबकड. ठाऊक नाही कुठाय्‌त?
आजोबा, तुमचा पत्ता
कुणालाच ठाऊक नाही.

मुंबई
३–४–६६

## शब्द

कधी कधी शब्द नुसतेच शब्द असतात,
म्हणजे नुसतेच शब्द असतात अर्थवाले.
पालवीवरल्या उन्हाचा कोवळेपणा
त्यांच्यातून झिरपत नाही;
मग ते वाक्य करतात :
कोवळेपणा याच्यासारखा, त्याच्यासारखा.
तरीपण शब्द नुसतेच शब्द उरतात :
व्याकरणाच्या घरातल्या निर्बुद्ध नोकरासारखे.

कधी कधी शब्द मात्र जादू होतात,
जुगारातल्या फाशांसारखे शब्द जेव्हा
हातांत घेऊन मी टाकतो
कधी कधी तेव्हा चुकून दान पडते :
फुलांचे रंग मग किलबिलताना ऐकू येतात—
शब्द त्या किलबिलीचा गुच्छ करतात;
शब्द होतात मऊ घरटे
आणि त्यात येऊन बसतो चंद्रपक्षी;
शब्द होतात सुरुंग :
काळोखाच्या पहाडाच्या टिकऱ्या करतात;
शब्द होतात मऊहिरवेगारमाहेर;
शब्द डोळ्यांत काजळ घालतात;
नदीच्या काठाने, रमतगमतवाटेने
शब्द मग चालू लागतात शीळ घालीत.

कधी कधी शब्द नुसते शब्द असतात,
कधी कधी शब्द नुसते शब्द नसतात.

मुंबई
२८–४–६६

# हात तुझे

हात तुझे इवलेसे
शुभ्र शुभ्र कबुतरसे...
मी घेतो डोळ्यांतुन
मिटुनि एक नितळ तळे
बघतो अन् संथ संथ
हात तुझे इवलेसे
शुभ्र शुभ्र कबुतरसे.

या माझ्या खिडकीच्या
काचेवर धूळ जरी,
आत्म्याला चढलेला
गंज जरी,
शब्दांवर कोळिष्टक
धरलेले दाट जरी,
कचऱ्यावर किरण जसे
उतरतात स्वच्छ तसे
हात तुझे इवलेसे
शुभ्र शुभ्र कबुतरसे.

मी घेतो डोळ्यांतुन
मिटुनि एक गगन निळे,
बघतो अन् संथ संथ
हात तुझे इवलेसे
शुभ्र शुभ्र कबुतरसे.

मुंबई
१०-१०-६६

# अग्नी

किर्र काळोखात जळणारा नग्न अग्नी,
झोपलेल्या झाडांवरून दौडत जातात धुराचे घोडे,
अतिदूरातून येणारा ढोलाचा मंद आभासमय आवाज,
पल्याडचा निद्रिस्त आदिवासी डोंगर.

मी एकटा उभा घनदाट जळणाऱ्या नग्न अग्नीपुढे
हवन करीत गिचमिडींचे गुणाकार,
जमाखर्च पापपुण्यांचे, बालिश बेरजा, गढूळ गाऱ्हाणी,
मनाच्या जुनाट माळ्यावरची संस्कारांची बोचकी.

किर्र काळोखात जळणारा नग्न अग्नी :
काळाच्या हातातून उडालेल्या तेजस्वी गरुडासारखा.
झोपलेल्या झाडांवरून दौडत जातात धुराचे घोडे.
मी एकटा उभा : अंतःस्थ, निर्लेप, सामोरा.

मुंबई
११–११–६६

# रेषा

भेकडपणा आणि नीती यांच्यात असते
एक सूक्ष्म रेषा डोळ्यांना न दिसणारी,
क्वचित् जाणवणारी एखाद्या विलक्षण क्षणी,
दिसो वा न दिसो, निखालस असणारी.

तू भीती उधळलीस उधाणलाटेवर,
ठेवलीस नीती सुखरूप सरावाच्या वाटेवर,
धुक्यापल्याडची अनवट वाट तुझी होती
जसे तुझे तापलेले रक्त अगदी तुझेच होते.

ज्याला दिसते रेषा त्याच्या मनात केवळ संशय
संशय आपल्या नीतीचा आणि आपल्या धैर्याचा;
तो नसतो रेषेच्या अल्याड वा पल्याड :
तो उभा असतो रेषेवर अपारदर्शक धुके होऊन.

तू होतीस गरम रक्ताचा आंधळा प्रवाह :
आंधळेपणामुळेच धुके आरपार भेदून जाणारा.

मुंबई
१३–१२–६६

## आकार

किरणांच्या छिन्नीने खोदलेली
ढगांची शिल्पे मी बघतो :
प्रचंड अवकाशखंडातून स्फुरणारी
आकारांची अनंत सत्ये,
आकारांतून स्वतःला नाकारीत
फुटणारे नवे आकार :

काही रोखठोक, सडेतोड,
पौरुषसंपन्न न हडबडणारे,
काही पावसाळ्यातल्या प्रतीक्षेसारखे
सोत्कंठ काळेभोर,
यक्षिणींच्या ओथंबल्या केसांतले गुलाब,
सुसाट पळणारे काळविटांचे कळप,
काही विस्मृतीच्या तळाशी
फिरणाऱ्या सावल्यांसारखे विचित्र,
काही अनादी अरण्यांतले वणवे...

किरणांच्या छिन्नीने खोदलेली
ढगांची शिल्पे मी बघतो...

मुंबई
२३-१२-६६

# नाव

उडणाऱ्या पाखराला नाव नसते,
त्याला असतात फक्त दिशा;
जाईल तिथे नजरेची फांदी असते,
माझेपणात जखडलेले झाड नसते.

तरीही आपल्या खिडकीच्या चौकटीतून
दिसणारे आभाळ केवळ आपलेच असते
आणि आपल्या आभाळातून उडणाऱ्या पक्ष्याला
अगदी आपले असे एक नाव असते :

जसे तुझे एक नाव माझ्या ओठांवर
केवळ माझ्या मनात हाक घालण्यासाठी.

मुंबई
४–६–६७

## किती हळुवार

किती हळुवार हे न बोलणे,
ओथंबून रहाणे अदृष्टात,
प्राक्तनाच्या वळणावर अबोल टपटपणे
प्राजक्ताच्या डहाळींसारखे.

वाटा खूप असतात पायांवर कोरलेल्या,
जो तो चालत असतो अटळपणे;
फारच थोड्यांना दिसतात पण
अबोलपणे सकाळची तरल उन्हे
अंगावर झेलणारी वाटेवरची झाडे.

फारच थोडे कोणी जगत असतात
जगण्याच्या आतले एक सूक्ष्म जगणे :
जशी गाण्याच्या आत आत असते
सूक्ष्म शांतता स्वरांचे गर्भाशय असणारी.

किती हळुवार हे न बोलणे,
ओथंबून रहाणे अदृष्टात,
प्राक्तनाच्या वळणावर अबोल टपटपणे
प्राजक्ताच्या डहाळींसारखे.

मुंबई
२१–८–६७

## घन वळले

घन वळले,
गवतावर हिरव्या लाटा,
थेंब टपटपले,
गंधार लागुनी
तीव्र जाहल्या वाटा.

घन वळले,
अनवरत कसे हे झरती!
कळसास धुके बिलगले,
घर माझे
हृदयाशी धारा धरती.

घन वळले,
कुरणावर भिजले बगळे :
मनातुन हलले
शुभ्र शब्दांचे
हे ओले पंखच सगळे.

घन वळले,
वाटेवर कुणिही नाही,
एकटा दूरवर बघतो...
अनाहत नादे
भरल्यात दिशा या दाही.

मुंबई
१०-९-६७

# पाऊस

(कुमार गंधर्व यांस)

झाडे गद्गदा हलवणारा वनघोर पाऊस,
थेंबांचा अपार उत्सव मनस्वी पानापानातून,
फांद्यांच्या हिरव्या जत्रेत गरगरणारे बिलोरी पाळणे,
आत्मा पिसाऱ्याहून फुलवणारा मुक्त मनमोर पाऊस.

पाऊस अस्तित्वाचा कळण्याहून अपरंपार,
अनादिमल्हार : कंठाला जन्म देणारा पाऊस,
वाटांचे आलाप क्षितिजाच्या समेवर कोसळताना
धुवांधार बरसणारा आनंदअनावर पाऊस.

हजार तंबोऱ्यांची षड्जगाज झोकणारा अवलिया पाऊस,
गोरखनाथाच्या हाकेसारखा अलखनिरंजन पाऊस :
हाक ऐकून नकळत उठून चालू लागतो आपण
दुर्लंघ्य पहाडापल्याडच्या निर्विकल्पात असा पाऊस.

मुंबई
२१–६–६८

## बंगला

या वर्षी, नाहीतर
कदाचित येत्या वर्षी
बांधीन म्हणतो बंगला
त्या तिथल्या गुल्मोहरावरच्या
लाल गर्द फुलांच्या कॉलनीत.

कधीच ठेवला आहे घेऊन
एक प्लॉट बंगल्यासाठी
पाखराच्या अलगद पायांत पुरेल एवढा :
तिथे—त्या दक्षिणेकडच्या फांदीच्या
किंचित् उत्तरेला,
सातव्या फुलघोसाच्या
चार नजरा पलिकडे,
वाऱ्याच्या मंजिरी झुळकीजवळ.

या वर्षी, नाहीतर
कदाचित येत्या वर्षी
अगदी निश्चित.

मुंबई
२७–६–६८

## बहर

झाडांना जुन्या फुलांच्या आठवणींनी घट्ट धरू नको :
मेलेली मनेच बसतात जुनाट आठवणींच्या ढोलीत
आंबट पिशाच्चे होऊन तुलनेचे तराजू तोलीत.

झाडांना मोकळे असू दे.

आता पुन्हा बहर येण्याची अलबेली वेळ येईल,
प्रचंड धांदल फांदीफांदीवर आटोकाट फुलण्याची,
कोवळे उन्हेरी झरे मावणार नाहीत पाखरांच्या कंठांत,
फुलांची अंगधीट उतावीळ मातीचे गालिचे करील.

झाडांना मोकळे असू दे.

मुंबई
२९-६-६८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
संदर्भ शाखा (स्थळ

## अस्वल

घुरट वासाचे केसाळ बंडल तसे अस्वल
असते बसून बाजाराजवळच्या फूटपाथवर,
बाजूला बसलेला अस्वलाहून मळकट दरवेशी
कळकट वेसण हातात धरून चुरगळल्या चादरीवर.

कसल्याही रोगावर जालीम इलाज अस्वलाचे केस,
नखे अस्वलाची अक्सीर दवा विकारावर कसल्याही :
खोकत दरवेशी सोडीत विडीचा धूर, खाजवीत मांडी
करतो जाहिराती घोषणा कानसघाशा घशाने.

माणसे येतात, माणसे जातात, माणसे उभी रहातात,
माणसे बघत जातात, माणसे न बघता जातात...
अस्वल बसून असते अधूनमधून मुस्कट हलवीत,
नाकावरल्या निगरगट्ट माशा नकाराने निवारीत.

तेवढाच एक ठाम नकार, बाकी अस्वल रिकामेमुकाट :
पावसाळ्यातल्या दमट काळोखाचा कोपराच जसा.
मधूनच तिरपे बघते डोळे किंचित् किलकिले करून,
पेंगते बघता बघता आपणच आपली नजर चुकवून.

काळोखतात रस्ते; प्रकाश चोपडून चेहऱ्यावर
सभोवती सजतात दुकाने; विड्या संपवून सगळ्या
उठतो दरवेशी प्राक्तन खोकत; हलते हातातली वेसण;
उठून उभे रहाते केसांचे मुकाट बोचके, चालू लागते.

उघड्या गटाराचा वास काळोखाला डसणाऱ्या
कुठल्या बकाल बोळात जाणार मुकाट्याने अस्वल ?
असतात अस्वलाला आठवणी हरवल्या पहाडांच्या ?
की अस्वल अगदी सोपे पहिलीतल्या धड्यासारखे ?

मी पहात रहातो अस्वलाकडे : आपणच आपली सावली होऊन
अंग ढकलीत दरवेशामागून काळोखात निघून जाणाऱ्या.

मुंबई
३०–६–६८

# चांदण्यास गुणतो मी

विसरुनिया गिचमिड ही
स्वप्नाळू काय लिहू ?
चार खडे आधी अन्
त्यानंतर एक गहू
हा इथे हिशोब असा;
बसलेला पार घसा.

काळोख्या माळावर
एकाकी झाड जसे
थरथरत्या फांद्यांनी
चंद्रकोर जपत असे :
मी तशीच तुजसाठी
हृदयातुन जपलेली
ही हळवी चंद्रकोर
जी न अजुन सुकलेली.

चांदण्यास गुणतो मी
दोन तुझ्या डोळ्यांनी,
चंद्रकोर गुणगुणतो
मिटलेल्या ओठांनी.

मुंबई
२०–८–६८

# तुफान

तुफान समुद्र खवळून उसळलेले :
लाटांचे पिसाळलेले कभिन्न सर्प,
पिळवटून मोडून पडतात काळोखाच्या फांद्या,
प्रचंड देवमासे ढगांचे कल्लोळत
कोसळतात कर्वतींसारखे एकामेकांवर.

किर्र वाटेवर झाडे झपाटलेल्या
भिजून चालताना चिंब एकटा
मिटून घेतो मला डोळ्यांत तुझ्या.

तुफान समुद्र खवळून उसळलेले...

मुंबई
१८–१२–६८

# सतार

अनोळखी झाडांवर अंधारात कुठेतरी
पावसाच्या सरीची फुलवंती गत वाजली :
खिडकीपाशी माझे डोळे डहाळी झाले
उत्कट फुलांच्या लयीत लपेटून घेत.

अंधारात दिसत नाहीत दूरची झाडे,
झाडे हळुवार ऐकू येतात पावसासारखी :
एक कोवळी सतार वाजत रहाते
अनोळखी झाडांवर, अंधारात, कुठेतरी...

मुंबई
१९–१२–६८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०९९
दा. क्र. २७.३९६
काव्य प्राकाज
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

# विश्वास

उच्चार करू नये विश्वासाचा,
तो डोळ्यांत जपून धरावा शब्दातीत :
पहाटेच्या सुकुमार आभाळासारखा.

हक्कांच्या हिशोबी हुकमतीतून
विश्वास पहावा उडून जाताना
पाखराच्या कुडीतून प्राण जावा तसा.

विश्वास असावा लय जगण्यातली,
जगणे व्यापणारी अतर्क्य बंदीश,
हिवाळ्यातल्या झाडांची सुजाण समजूत.

थंडगार धुक्याचे ढग वहाताना अंगावरून
दिसत नव्हतो एकामेकांना. शब्द नव्हते.
विश्वास होता. जसे आपण होतो.

मुंबई
२२–१२–६८

## आनंदवनातले

आनंदवनातले हे उनाड, हिरवे रावे
यांचे अनावर पंख कुणी धरावे?
हे अतर्क्य आशयाचे मनोमय उच्चार
यांना शब्दांत कुणी गिरफदार करावे?

हे हिरवे पाहुणे अकल्पिताचे रहिवासी :
ठाऊक नसते हे कधी घरा येतील!
सर्वस्वाचे अंगण करून यांची वाट पहावी,
यांची शकुनलक्षणे अचानक उमजावी.

यांच्यासाठी पसरून ठेवावी पिकलेली उन्हे मनात :
न जाणो हे हिरवे प्राण केव्हा अवतरतील!
आत्मनिमग्न वहाणाऱ्या झऱ्याकाठी
शुभ्र वाऱ्याचा रुमाल धरावा खुणेसाठी.

हे येतील, न येतीलही, कुणी सांगावे?
आनंदवनातले हे उनाड, हिरवे रावे.

मुंबई
२६–१२–६८

# भास

सूर्यशुभ्र घोडे दौडत जातात डोंगरमाथ्यावरून,
आवाज टापांचे पंखावत येतात माझ्या दिशेने,
कणखर टापांचे प्रतापी घोष कड्यांवरून कोसळतात :
घुमत रहातात कानांत ध्वनिसंकेत अलौकिकाचे.

कुठल्या वाटेने येतात घोडे कळत नाही :
तृष्णेच्या काठापल्याडचे निर्द्वंद्व साक्षात्कार,
आभासवत् स्फटिकांचे झोत झळाळत जातात
थरारल्या झाडांचे हिरवेगार मंत्र करीत.

नाग प्रकाशाचा सळसळत जावा कण्यातून ऊर्ध्वगती
तशी जाते रांग यांची लखलखत डोंगरमाथ्यावरून,
हे प्रकर्षप्रतापी तरी बलाकमालेहून हळुवार,
हे योगस्थित खुणा आत्मसंभव प्रकाशाच्या.

निळ्या निराकारातून तरंगत जातात सूर्यशुभ्र घोडे,
सोनेरी अश्वत्थाभोवती अचानक लयबद्ध...संथ होतात
तेव्हा जाग मावत नाही कुठल्याही आकारात,
प्रत्येक वस्तूतून उगवते कालातीत, शुभ्र पहाट.

मुंबई
१०–३–६९

## किंमत

बोलू नये : मिटल्या डोळ्यांनी सांगावे पाण्यापाशी,
बुडून जावे आपणच आपल्या अबोलपणात,
शपथ घालू नये कासाविशीने श्वास बांधीत,
आपल्याच प्राणात ठेवावी आपली दिवेलागण.

झाडावरचे पाखरू दूरचे वळण पाहील :
उडून जाईल आपणच एक वळण होऊन,
त्याच्यापाशी द्यावी मनातली सोनजांभळी संध्याकाळ
काळोखाचे रान खोल खोल भरून येण्याआधी.

सांगू नये कुठल्याही क्षणावर हक्क आपला,
बांधू नये पाखराचा पाय कधी फांदीला,
हातात हात गुंफून चालत असताना
होऊ नये आपण कुणाभोवतीचा पिंजरा.

चांदण्यात गाव बुडेल तेव्हा एकटे असावे,
थांबू नये झाडांची गळून गेली पाने मोजीत;
एकटेपण हीच खूण असते उत्कट जगण्याची :
मोजू नये आपल्या गाण्यासाठी दिलेली अटळ किंमत.

मुंबई
८–६–६९

# मोर

लयमग्न मोर. काळ्याभोर सावल्यांनी
हृदयाशी धरलेले. मोर घनश्याम.
मधूनच उमललेले उन्हाचे सोनसाळीक
हळुवार हुंगणारे मोर. पिसांची गाणी
डोहाच्या काठाशी सांडणारे नटराज मोर.
मोर रानभर आनंदनिळे. स्तब्ध शिल्पातल्या
अनावर चैतन्यासारखे मोर. अदृष्टातून वहाणारे
कृपेचे घननीळ झरे तसे मोर.

कुठून आले हे मोर ? काल नव्हते इथे.
किती एकाकी होते हे रान !
मेघांसाठी झाडांजवळ हाक नव्हती.
वारे वहात होते सवयीच्या गतीने.
डोहावर होते साचलेले कंटाळवाणे शेवाळ.

मोर आले. अचानक भरून भरून मोर आले.
झाडांनी अलगद झेलले हे निळे जादूगार.
मुक्या रानात नाचू लागले मोर :
लख्ख निळे उत्सव इथे...तिथे...सर्वत्र.
गर्द हाक घातली मोरांनी हृदयस्थ मेघांना.
अधिकच घननीळ होत गेले मोर :
सारे रान निळे गाणे करून टाकले मोरांनी.

मुंबई
१०–१०–६९

## त्या झपाटल्या रानात

पाण्यात खोल कोसळले
आभाळ रंगबेभान,
मी तुझ्या संगती होते
लावून दिव्यापरि प्राण.

मग काळोखत गेलेल्या
त्या झपाटल्या रानात
हळुवार तुझी मी होते
घेऊन दिवा प्राणात.

काळोख नदीपरि वाहे,
आभाळ फिरे पाण्यात,
कोमेजुन गेला नाही
तो दिवा : अजुन गाण्यात.

मुंबई
११-१-७०

## तरी

फांदीफांदीवर
खुणा तुझ्या :
डोळे मिटले तरी,
नाही मिटले तरी.

फुलाफुलातून
हाक तुझी :
गंध दाटला तरी,
नाही दाटला तरी.

रात्र माझ्यासाठी
होते तुझी :
हात जुळले तरी,
नाही जुळले तरी.

माझा नाहीस तू
कशी म्हणू?
असे म्हटले तरी,
नाही म्हटले तरी.

मुंबई
१-११-७०

# मूड

सुन्न खिडकीवर
कर्कश कर्वत
किरं कावळ्याची.

तापकरी ग्लानीसारखी
बाहेर दुपार,
कोरड अपार.

काटेरी फेरीवाला
आवाजाचे आंधळे ओरखडे
ओढीत जाणारा
अटळ.

विचित्र कोळी
कपाळातून
भगभगत सरकणारा
रितेपणा विणीत.

भिंतीवर घड्याळ
सुजमट चेहऱ्याचे.

तापकरी ग्लानीसारखी
बाहेर दुपार,
कोरड अपार.

मुंबई
२६–२–७०

## सर भरून

सर भरून आलेली,
सर झरून गेलेली.

भिजलेल्या झाडांचा
फिकट वास या उन्हास,
झुळझुळती हे बगळे
खडकांच्या आसपास...

घनभरून आलेली,
सर झरून गेलेली.

जणु हिरवा कुर्निसात:
पोपट हा झुकुनि उडे,
ओलेत्या आरशांत
पंखांचे बिंब बुडे...

मनभरून आलेली,
सर झरून गेलेली.

रोमांचित रानातुन
गंधगगन थरथरले,
बघत उन्हे ओलवली
माझे डोळे भरले...

स्वरभरून आलेली,
सर झरून गेलेली.

मुंबई
१९–१२–७०

# प्रोफेसर

रिटायर्ड डोईवर प्रोफेसरांच्या एकही केस उरला नाही
उपडा कमंडलू ठेवावा तसे तुळतुळीत, भिक्खुशीर्ष !
पिवळट पडलेल्या ग्रुपफोटोत कॉलेजातल्या केस होते,
लग्नानंतर कागदी फुले हातात धरून काढलेल्या फोटोतही.

तसे सारे ठीक झाले. नोकरी लागताच काढलेल्या नोट्सवर
अखेरपर्यंत ज्ञानदान केले. वर्गात टारगट कार्टे एकदा ओरडले :
" सर, नवी माहिती नाही, निदान वही तरी नवीन घ्या. "
सायलेन्स ! आवाज वटारताच सारे चिडीचूप झाले.

संसार मार्गी लागला. मुलगा अमेरिकेत स्थायिक झाला.
मुलगी कॅनडात सुखाने संसार करू लागली. इथे उरले
प्रोफेसर, त्यांची बायको आणि बायकोचा दमा. रात्रभर
ढास लागते पावसाळ्यात. अंधारून आल्यावर एकटे वाटते...

एक असह्य उंदीर भयभीत उड्या मारतो डोक्यात :
कवटीच्या पिंजऱ्यातून बाहेर पडू शकत नाही. प्रोफेसर
मुलाचे पत्र उघडून वाचू लागतात, पहातात नातवाचा फोटो
मुलाने पत्रातून पाठवलेला. वंशवेल वाढतो आहे सुखरूप.

गोंगाट गिरवीत दिवस येतात, रात्री येतात दमेकरी, खुंटीवरच्या
ढगळ पँटीसारखे लोंबकळतात प्रोफेसर अनाकलनीय अंधारात...

मुंबई
२४–२–७१

## संवाद

उन्हे ओली
सांज भोळी
डोळे डोळ्यांचे मागणे

कळलेले
जुळलेले
मौन फुलांचे सांगणे

नभ मोर
चंद्रकोर
जळी आभाळ वाहते

कुणी तरी
कुठे तरी
उगी जिवास बाहते

मुंबई
२६–२–७१

## स्वप्नचित्र

गाण्याच्या काठावर
नारिंगी चंद्र हळू झुकलेला,
रुमझुमत्या झाडांतुन
शब्दांविण अर्थ गहन पिकलेला.

वाऱ्याच्या बोटांवर
दवओल्या गवताचा मंद वास,
खडकातुन पाझरतो
विरघळल्या जाईचा शुभ्र भास.

रात्रमग्न डोंगरात
सोनेरी जाळ मंद झिळमिळतो,
पाण्यातुन बिंब हले :
स्वप्नातुन रंग जसा झुळझुळतो.

मुंबई
४–३–७१

## बाग

कानशिलांवर आदळणारा थंड वारा, मंद उन्हे,
तो बागेत झपाटल्यागत एकटा उभा. मधूनच
स्तब्धतेत चीत्कार खुपसून पोपट झाडावरून उडे,
हळूहळू सावल्या सगळ्या सरपटत जमा झाल्या...

इथूनच तिच्या सोबत एकदा चालत गेला होता :
हातांत हात गुंफले होते ? असतील...नसतील...
दोघांच्याही मौनातून एकच वीज वहात होती,
दोघांनाही खोल वेढून एकच स्पंदन थरारणारे...

इतके अटळ सत्य त्याने प्रथमच अनुभवले :
अटळ पकड स्पर्शाहून प्रत्यक्ष जाणवली;
धुंदीच्या डोहात जाणीव खोल खोल कोसळली :
तिचा हात धरून तो सहजपणे वर आला.

कानशिलांवर आदळणारा थंड वारा तीक्ष्ण झाला,
त्याला वाटले सावल्या आता सापांसारख्या विळखा घालतील..

मुंबई
८–३–७१

## वाक्य

कर्ता काळा
काळा पहाड

कर्म धुंद
धुंद हवा

क्रिया शुभ्र
शुभ्र झरा

असे जेव्हा
वाक्य जुळेल

तेव्हा एक
गाणे मिळेल.

मुंबई
३०-५-७१

## नाते

पांघरूण लांडे झाले :
पाय डासांनी फोडले,
विस्कटल्या झोपेतही
नाते स्वप्नांशी जोडले...

धूर दाटून घरात
जरी डोळे ओले झाले
तरी माझ्या कौलांवर
निळे निळे मोर आले...

धापा टाकीत वाहिले
जरी मीच माझे मढे
तरी माझे शब्द होते
होत आकाशाएवढे.

मुंबई
५-६-७१

## कविता शब्दांची

शब्द वाऱ्यासाठी, वाऱ्यावर विरून जाण्यासाठीही,
शब्द दवाच्या थेंबातल्या चिमुकल्या आकाशासाठी,
शब्द झाडाच्या निष्पर्ण एकान्तासाठी,
शब्द काळोखाच्या काठाशी उमलणाऱ्या फुलासाठी.

शब्द जिवापाड जपलेल्या ओझरत्या अंगभेटीसाठी,
शब्द पावलांना गुदगुल्या करणाऱ्या कोवळ्या लाटेसाठी,
शब्द पाण्याकाठच्या चांदण्याच्या देवळासाठी,
शब्द गाभाऱ्यातल्या फुलांच्या ओल्या वासासाठी.

शब्द खोल कळलेल्या समजूतदार दुःखासाठी,
शब्द निष्पापांच्या घावावर बांधण्यासाठी,
शब्द कालच्या काळोखाच्या विध्वंसासाठी,
शब्द नव्या पहाटेच्या दुर्दम्य आश्वासनासाठी.

शब्द अंतर्यामीच्या निःशब्द साक्षित्वासाठी,
शब्द कान्ह्यापुढे मायेने बोबडे होण्यासाठी.

मुंबई
४–१२–७१

# काच

काच : स्वच्छ. पारदर्शक.
थंड साक्षी.
काच दिसते आणि दिसू देते,
काच बोलत बसते
अर्थापल्याड प्रतिमांच्या भाषेत...

मी पहातो काचेतून पलिकडे
पाऊस-सळसळीचे झाड :
जे झाड असते किंवा असते प्रतीकही,
मी काचेतून डोळ्यांनी कुरवाळतो
फांद्यांतून फुटलेल्या हिरव्यागार पाखरांना :
म्हणजे मी नेमके काय करतो ?
किंवा काय करीत नाही ?

काचेतून दिसतो पलिकडचा रस्ता,
रस्त्यावरची माणसांची संदर्भशून्य ओळ,
तारेवर लोंबणारा फाटका पतंग,
गटारातून बेढब पळणारी घूस,
लाल कौलांवर सांडलेले ऊबदार ऊन,
कंटाळलेली रिकामी हातगाडी,
गुलाबाची फुले घेऊन घाईत जाणारा माळी,
जगणाऱ्यांना समांतर जाणारी प्रेतयात्रा...
काचेपल्याडच्या या सर्वांचा अर्थ कोणता ?
काचेअल्याडच्या माझ्याशी दुवा कोणता ?

काचेपाशी उत्तर नसते :
काच असते एक पारदर्शक निरुत्तर.

मुंबई
२१–१२–७१

# उकरून माती अक्षरांची

उकरून माती अक्षरांची मी पुरून ठेवली
हातातली काही मूल्ये धुगधुगी असलेली,
आवेगांच्या उत्सर्गाचे खत टाकले,
अनेकदा आठवणींने पाणी घातले मायेने,
कधी संचिताच्या पावसावरच दिले सोपवून,
कितीदा मध्यरात्री तस्यां जागर्ति संयम्यासारखे
कुतूहलभरल्या डोळ्यांनी पाहिले
काही हिरवे हिरवे झंकरते किंवा काय
अक्षरांखालून हलकेच वर डोकावणारे...

मग विसरूनही गेलो, अगदी पार विसरून
आणि बाजारगर्दीत बुडालो विक्रयासाठी:
कितीदा कण्यासकट पाठीवरचे ओझे विकले,
कितीदा गरजेच्या खिडकीतून सराईत खुणा केल्या
तऱ्हेतऱ्हेच्या सुकाळ गिऱ्हाइकांना भुलवण्यासाठी,
कधी स्वतःच पोस्टर होऊन टांगून घेतले
रस्त्यावरच्या गर्दीला भडक निमंत्रणे देत.

अचानक आठवले आपण पुरली आहेत मूल्ये
अक्षरांच्या मातीखाली हिरवागार कोंब फुटण्यासाठी :
उतरलो पोस्टरच्या चौकटीतून खाली,
सुटलो धावत धापा टाकीत
होलसेल विक्रयाच्या झगमगत्या पेठांवरून,
अखेर मिळाली जागा जिथे पुरली होती मूल्ये
आणि घालीत उभा राहिलो पाणी वेडसर तंद्रीत.
आताही जमले लोक पुन्हा माझ्या भोवती :
शहाण्यांच्या समुद्रात मी एकटा वेडा
मीच पुरलेल्या अक्षरांखालच्या मूल्यांना पाणी घालीत,

वाट पहात थरांखालून अक्षरांच्या
हलकेच वर येणाऱ्या हिरव्यागार पहाटेची...

मुंबई
२३-१२-७१

# रात्रभर आपण चालतो आहोत

रात्रभर आपण चालतो आहोत...
पहाट होईल तेव्हा आपण कुठे असू ?
पायांतले त्राण राखून ठेव.
कुठेही असलो तरी पहाट होणारच.
तू धीर धर. आपण धीर धरू.
रात्रभर आपण चालतो आहोत...

माझा हात हातात धर.
भिऊ नको. एक गोष्ट सांगतो
जी झाडाने पाखराला सांगितली होती :
झाड म्हणाले, "अंधार असतो म्हणजे प्रकाश नसतो.
पण प्रकाश येतोच आणि मग अंधार उरत नसतो."
पाखराने गोष्ट ऐकली आणि ते विश्वासाने झोपले.
ही गोष्ट फक्त रात्रभर चालणाऱ्यांसाठी आहे.
रात्रभर आपण चालतो आहोत...

चालताना आपण काळोखात
या गोष्टीची सोबत असेल
जी झाडाने पाखराला सांगितली होती.
आणि झाडे पाखरांशी खोटे बोलत नाहीत
म्हणून तर झाडांना फुले येतात.
रात्रभर आपण चालतो आहोत...

पहाट होईल तेव्हा आपण जागे असू.
तेव्हा आपण कुठे असू ?
कुठेही असलो तरी पहाट असणारच.
कुठेही असलो तरी आपण प्रकाशातच असू.
उडणाऱ्या पाखरांच्या पिसांना
फुलांचा हळुवार वास असेल.

माझा हात तुझ्या हातात असेल.
सर्वत्र सर्वत्र निरामय पहाट असेल.

रात्रभर आपण चालतो आहोत...चालणार आहोत...

मुंबई
२५–१२–७१

## असंबद्ध पावसात

काळोखाच्या बसमधून मी उतरतो असंबद्ध पावसात :
सापडत नाही मला माझ्याच घराकडे जाणारी वाट,
भोवतालच्या वस्तुजाताचे आकार हरवतात ओल्यामिट्ट अंधारात,
न थांबता कोसळते पाणी चहूकडून अनावर आवेगाने,
वेडसर हातवाऱ्यांसारखे थंडगार वारे पछाडल्यागत
ढकलून देतात वाकडेतिकडे काळ्या दिशाहीन कल्लोळात.
माझे पाय चालू लागतात माझ्या नियंत्रणापलीकडच्या गतीने
एका अर्थशून्य अफाटात हेलकावत जाणाऱ्या गलबतासारखे,
आखलेल्या रस्त्यांची सुसंगती गढूळ पाण्यात वाहून जाते :
मी चाचपतो माझ्या आठवणीतले सांकेतिक शब्द
पण तेही भिजून गेलेले असतात खिशातल्या आगपेटीसारखे,

सपकाऱ्यातून श्वास सावरीत मी उभा रहातो ढळत ढळत
चहूदिशांनी अंधारात कोसळणाऱ्या असंबद्ध पावसात...

मुंबई
१६–१–७२

# काजळे ही सांज

पांढरे पक्षी जशी की पांढरी होडी
वाहते पाण्यासवे, हेलावते थोडी.

या उन्हाने केवड्याची ढाळिली पाने,
हूल आली केशराची : भारली राने.

थांबली चित्रापरी ही गस्त माडांची,
गुंतली पाण्यात भाषा गर्द झाडांची.

भोर काळी एक होडी स्वप्नकाठाशी,
बोलते ही गूढ काही मंद लाटांशी.

काजळे ही सांज...रस्ता लांबला आहे...
चंद्र हा माझ्याचसाठी थांबला आहे.

मुंबई
६–२–७२

## आभाळ

कधी कधी हे शहर भासतं मला
एखाद्या प्रचंड पिंजऱ्यासारखं,
एकही झाड नसलेल्या रस्त्यासारखं.
माणसं आणि माणसं आणि माणसं :
प्राणहीन भाषेत शिकवल्या जाणाऱ्या कवितेसारखी;
त्यांच्यांत असतं जिवंतपण खोल खोल कुठेतरी
पण त्यांना तिथे पोचण्यासाठी
नसते कुठलीच लोकल ट्रेन...

थवे चुकवीत गर्दीचे
मी चालत जातो एकटा :
मैदानाच्या कडेला भेटतं
एकुलतं एक झाड उभं असलेलं;
मी हसून बघतो वर झाडाकडे :
फांद्यांवर त्याच्या असतात बांधलेली
कुणीतरी आपली मळकी अंथरुणं,
टांगलेले टिनचे टमरेल
आणि एक पिंजरा गंजल्या तारांचा
कुणाचा आणि कशासाठी कुणास ठाऊक
पण त्यात नसतो एकही पक्षी :

मला बरं वाटतं बघून,
निदान एका पिंजऱ्याबाहेर तरी आभाळ
शिल्लक असतं !

मुंबई
१३–१०–७२

## ओळखीची सर

पहाटेला आलेली ही ओळखीची सर
ओले ओले करणारी फुलांत केसर...

किती दूर गेले फूल :
आली डोळयांवर भूल,
एकाएकी पाकळ्यांना पडला विसर...

पहातो मी पुन्हा पुन्हा
कुठे दिसती का खुणा :
गवतात मावळली फुलांची कुसर...

जीव लाविलेला असा
घेता परत ये कसा ?
पापण्यांत जग झाले धुक्याने धूसर...

नासिक
२२–१०–७२

## दिवस माझे तुझे

सरींत सोनचाफा
भुलून भिजण्याचे
दिवस माझेतुझे,
प्राणांत अचानक
सुगंध भरण्याचे
दिवस माझेतुझे...

बोलता बोलता श्वास
घालू लागले उखाणे,
चालता चालता वाट
पावलांत झाली गाणे.

लाजत सोनउन्हे
मातीत रुजण्याचे
दिवस माझेतुझे,
सरींत सोनचाफा
भुलून भिजण्याचे
दिवस माझेतुझे...

सर झेलीत झेलीत
एक पाखरू उडाले,
तारू ओल्या किरणांचे
निळ्या स्वप्नात बुडाले.

श्रावणभुलाव्याचे,
आतल्या ओलाव्याचे
दिवस माझेतुझे,
प्राणांत अचानक

सुगंध भरण्याचे
दिवस माझेतुझे.

नासिक
२३–१०–७२

## कोकरू

काळ्याभोर खडकावरून
शुभ्र शुभ्र कोकरू झऱ्याचे
निघाले लडिवाळ उडी घेऊन.

कोवळ्यापोपटी झुळझुळीपाशी
थांबले कोकरू उगीचच,
घेऊन फेसाळ वाटोळीं गिरकी
कोकरू चंद्र झाले स्वतःभोवती.

मग कोकरू पुढे निघाले बागडत
माझ्या स्वप्नांची लोकर लपेटून...

मुंबई
२८–१–७३

## पक्षी

गर्द रानात रानात हरवला पक्षी
पुन्हा मनात सजण गवसला पक्षी

निळ्या गाण्याचा मुखडा
आभाळाचा की तुकडा
असा सुखाचा पाऊस बरसला पक्षी

भिजे उन्हाच्या तळ्यात
रुजे आपुल्या गळ्यात
पंखपणात अपार बहरला पक्षी

कोण्या देशातून आला ?
कोण्या देशास निघाला ?
झिम्मा वाऱ्याशी खेळता विसरला पक्षी

रान पावसात बुडे
पक्षी निथळत उडे
ओल्या शब्दांच्या प्राणांत उतरला पक्षी

मुंबई
१०-५-७३

## सात कडवी भिजलेली

पहिला पाऊस येतो आधी
आजीच्या पाठीवरच्या घामोळयावर,
बाजूला मी उभा भिजत,
माझा मलमलचा इवलासा सदरा ओलाचिंब.

झाडांच्या हिरव्या गाई तहानेल्या
पहिल्या पावसात पानांनी शहारत
उचलतात डोकी वर, झेलतात सरी.

वर्षभर बांधून ठेवलेल्या छत्र्यांचा
प्रथम उघडतानाचा गंजट वास,
त्यांवरच्या धुळीने नाकात सुटणारी चमत्कारिक खाज.
पहिल्या पावसात भिजताना जुन्या छत्र्या
कळते : त्या असतात जिवंत प्राणी
ज्यांच्या काळ्या कातडीतून झिरपते पाणी
लोखंडी तारांच्या बरगड्यांपर्यंत.

पहिल्या पावसात मी पाहिल्या आहेत
खिडक्या घरांच्या पक्ष्यांसारख्या उडून जाताना,
पण त्या परत येतात मात्र इमानाने
पुन्हा आपल्या जागेवर गजांसकट.

पहिला पाऊस न विसरता येतो
पत्र्याच्या डबऱ्याची कुंडी शोधीत :
त्याला कशा कळतात कुणास ठाऊक
डबऱ्यातल्या स्वप्नाळू मातीत
मी पुरलेल्या गाण्यांच्या बिया.

पहिल्या पावसात भिजताना
रानातले पक्षी
ओल्या उन्हाचे गाणे गातात
असे मला एका झाडाने सांगितले होते.

पहिला पाऊस डोळे मिटून ऐकताना
आपल्या आत आत सापडते
एक नवे आभाळ
मातीच्या ओल्या वासाच्या देवळावर.

मुंबई
२९–५–७३

## प्रश्न आणि उत्तर

डोळे कशासाठी ?
तुला साठवून मिटून घेण्यासाठी...

आला भरून पाऊस,
नको एकटा जाऊस.
सरी कशासाठी ?
तुला बिलगून भिजून जाण्यासाठी...

नाव तुझे मनातले
चांदणेच रानातले,
शब्द कशासाठी ?
तुला आठवून भरून येण्यासाठी...

वेल मोहरून आली,
फुले अंगभर झाली.
वारा कशासाठी ?
गंधवनातून पाखरू होण्यासाठी...

असा तुझा भरवसा
चांदण्याचा कवडसा.
ओठ कशासाठी ?
उरीं थरारून जुळून गाण्यासाठी...

मुंबई
२२–८–७३

संग्रहालय ठाणे
२५०९
दा. क्र. २४३९६
काव्यग्रंथ
शाखा (स्थळ प्रत)

## झाडे

नदीकाठी
मुक्यामुक्या अंधाराला
गवताचा वास ओला.

झाडे उभी
स्वतःतच खोल खोल
काही कळून अबोल.

मुंबई
१९-८-७४

## थरथर

कुरणावर
उडताना बगळे
चिंबचिंब
भिजले की सगळे

झाडाला हलु
वळसा गरगर
पंखांवर
थेंबांची थरथर

मुंबई
१९–८–७४

# जाग

झोपेतच
पावसात भिजणारे जग,
गाढ ओल्या इमारती,
झाडेसुद्धा बुडलेली
खोल पाऊसगुंगीत,
कुठे गेले सारे पक्षी ?

एकटीच जाग माझी
सावल्यांच्या डोहातील
सरी व्यर्थ मोजणारी...

मुंबई
१९–८–७४

## घर इवले

गुल्मोहर तीन उभे दाटीने :
राव्यांचे रानच की गर्द झुले.

तान्हेली गाय जशी
झुकुनि उभी पाण्याशी :
कौलारू घर इवले
या हिरव्या कुरणाशी.

मुंबई,
१९–८–७४

## बाधा

पलिकडल्या वाटेवर फुलांशी कुजबुजणारे ऊन गप्प झाले
माझी पावले वाजताच : खरे तर मी जात होतो झपाझप
मुख्य रस्त्यावरून ऑफिसकडे, गाडी चुकू नये म्हणून.

गाडीच्या खिडकीतून दिसणाऱ्या पलिकडच्या डोंगराआड
धरला कुणीतरी पडदा धुराचा, डोंगर मला दिसू नये म्हणून :
खरे तर मी होतो हातातल्या वृत्तपत्रात सवयीने डोळे खुपसून.

खिडकीवर बसलेले गोजिरवाणे कबूतर सावध होऊन
बघू लागले माझ्याकडे अकारण, अधिक सावध, गेले उडून :
खरे तर मी करीत होतो मनात बँकेत ठेवलेल्या पैशांची बेरीज.

आरशात पाहू लागलो आणि माझेच प्रतिबिंब झपाटल्यागत
लागले पळू हातात माझी कवितांची वही घेऊन :
खरे तर मी बघत होतो आरशात माझे यशस्वी देखणे प्रतिबिंब.

मुंबई
२२-८-७४

## मनातल्या गाण्यावर

पानांतून वाजे वारा
जसे ओळखीचे पाय,
ऊन उभे अंगणात
जशी बांधलेली गाय.

हवेचिया डहाळीला
फुटे पाकळींचा झुला :
फूलपाखराने तसा
झोका कोवळा घेतला.

रेघ रेखीत पांढरी
उडे पक्षी पाण्यावर,
झुके किरणांची फांदी
मनातल्या गाण्यावर.

मुंबई
७–१–७५

## वाटा

वाटा लालगर्द पांगाऱ्याच्या फुलांच्या,
वाटा काळ्याभोर भुसभुशीत,
वाटा सनईची मींड घेणाऱ्या,
वाटा चढणीच्या दमछाक करणाऱ्या,
वाटा चपळ खारी,
वाटा रवंथ करणाऱ्या सुस्त म्हशी,
वाटा भाताच्या लोंब्या हुंगीत जाणाऱ्या,
वाटा सरींचा झिम्मा झेलणाऱ्या,

वाटा पहिल्यावहिल्या भेटीच्या,
वाटा चांदण्याच्या मिठीच्या,
वाटा काजूच्या मोहोराने घमघमलेल्या,
वाटा भांगातल्या पिंजरेच्या,
वाटा तिरप्या नजरेच्या,
वाटा मातीच्या वासाच्या,
वाटा हळुवार श्वासाच्या,
वाटा गर्भारशी,

वाटा बाळपणाची कोवळी उन्हे जपणाऱ्या,
वाटा चिंचांनी गाभुळणाऱ्या,
वाटा हिरव्यागार पुस्तकातल्या पिसासारख्या,
वाटा बोबडकांद्याच्या,
वाटा अवखळ फांद्यांच्या,
वाटा आजीच्या गोष्टीसारख्या खिळवणाऱ्या,
वाटा पिवळ्या पाकोळीच्या भिरभिरणाऱ्या,

वाटा झपाटलेल्या झाडांच्या,
वाटा गोमटेश्वर माडांच्या,

वाटा कातरवेळी एकटे परतताना भ्यालेल्या,
वाटा न परतण्यासाठी गेलेल्या,

वाटा आपणहून उंबरठ्याकडे येणाऱ्या,
वाटा पायांअगोदर फुटणाऱ्या,
वाटा अकारण तुटणाऱ्या,
वाटा पावलांचा जुगार खेळणाऱ्या,
वाटा चांदण्याच्या गवतात लोळणाऱ्या,
वाटा रात्रीच्या हातातल्या सतारीसारख्या,
वाटा आंधळ्याच्या हातातल्या एकतारीसारख्या,
वाटा आपल्याच तंद्रीत गाणाऱ्या,
वाटा तिऱ्हाइतासारख्या अलिप्तपणे जाणाऱ्या,

वाटा केविलवाण्या म्हाताऱ्या,
वाटा दारुड्याच्या पावलात अडखळणाऱ्या,
वाटा काहीच न शोधणाऱ्या,
वाटा काळोखात मरून पडल्या सापासारख्या,
वाटा सतत स्वतःला पारख्या,
वाटा फाटलेल्या स्वप्नांपाशी रेंगाळणाऱ्या,
वाटा कड्यावरून कोसळणाऱ्या,
वाटा शब्दही न बोलणाऱ्या,
वाटा कंटाळून चालणाऱ्या
वाटा वेध लागूनही दिसत नाहीत अशा,
वाटा अतर्क्य वेड्यापिशा,
वाटा पाण्याजवळून जातानाही तहानेल्या,
वाटा प्राक्तनाला भेग गेलेल्या,

वाटा हिशोबी यशाकडे सरपटत जाणाऱ्या,
वाटा सत्तेच्या मैलांचे दगड मोजणाऱ्या,
वाटा कठोरपणे नाकारलेल्या,
वाटा लाचार होऊन जवळ केलेल्या,
वाटा गर्दीच्या पायाखालच्या एकाकी,

वाटा झोपड्यांचे फोड आलेल्या,
वाटा शेकडो वर्षे तुडवल्या जाणाऱ्या,
वाटा पँथरसारख्या त्वेषाने उडी घेणाऱ्या,
वाटा रक्ताळून सूर्य शोधीत जाणाऱ्या,

वाटा देवळांजवळ भजनांनी भिजलेल्या,
वाटा पहाटेला भिडलेल्या,
वाटा भोळ्याभाबड्या पाखरांसाठी,
वाटा मऊमऊ कोकरांसाठी,
वाटा माणसांच्या सावल्यांच्या,
वाटा न जन्मलेल्या पावलांच्या..

मुंबई
२३-१-७५

## होडी

दाट नदीकाठ आणि कासावीस वेळ :
निघे काळोखात होडी कातर...व्याकुळ,
फासलेले प्रकाशाचे भस्म झाडीवर
कधीचेच काजळले पैलथडीवर,
स्वत:पलीकडे एक पक्षी पाहे उडू,
खोल खोल काळोखात नदी लागे बुडू.

काळोखाची हवा आणि काळोखाचे गाव,
होडीने टाकिले आता पुसूनिया नाव :
निनावात निघताना थरथरे प्राण,
काळोखात डुचमळे अनामिक जाण,
पूर्वजन्म तसे दूर वसतीचे दिवे
मागे मागे सरकती...निखळती दुवे.

होडीने हिशोब आता झुगारला सारा,
ओळख सांगाया नाही आभाळात तारा,
अनोळखी लयीवर कळू लागे तोल,
अनावर ओढ आणि पाणी होय खोल...

मुंबई
३–८–७६

## यात्रा

कुणास ठाऊक कुठल्या वाऱ्यांनी जाग येते डहाळीला,
मुळांना भिडणारे पाणी होते रंग आणि सुगंध,
चिरेबंद काळोख भेदून येतो कोवळा किरण
आणि उगवते डहाळीच्या अंगात सोनेरी पहाट.

प्रत्येक डहाळी एक अटळ शोध असतो फुलाचा :
हिरव्याओल्या गाभाऱ्यातल्या उत्सुक अंधारात घुमते
फुलाची दिशा शोधीत शोधीत निःशब्द हाक,
फुलेही येत असतात धुंदीत डहाळीतला गाभारा.

झिम्म पावसाची ठाय लय शोषून घेताना माती
आपणच होते एक रहस्य स्वतःला शोधणारे :
ज्या शोधातून उमटतो हुंकारासारखा हिरवा अंकुर
भोगीत साक्ष ज्याची झपाटतात जंगलांचे समुद्र.

एक पांढराशुभ्र झरा निघतो उगमाच्या यात्रेला
याच साक्षीने स्वतःच्या आत शोधीत हिरवा हुंकार,
सोनेरी पाउ मढलेला शुभशकुन हाक घालतो अचानक
आणि उचू लागतो डहाळीला फूलपाखरांचा गर्द थवा.

मुंबई
४–८–७६

## सोबत

उधळलेल्या घोड्यासारखा पाऊस रस्त्यावर अनावर,
निडर धावणाऱ्या मोटारीही आज गोगलगाई,
रस्ते तुडुंबगढूळ, धूमधारांनी गुदमरलेली झाडे, घरे,
भिजलेल्या कावळ्यांसारख्या छत्र्या चिंबकेविलवाण्या.

त्याच्या सोबतीने चाललेली ती रस्ता ओलांडीत.
नऊ मास भरलेली. जड चाल. धारांच्या माऱ्याने
अधिकच जड. त्याचेही तिचा हात धरून सावरीत,
श्वास आवरीत चालणे. भांबावल्या पावलांनी. चिंब भिजून.

त्याने हातातली हेलकावती छत्री घट्ट धरलेली
तिच्या डोक्यावर. मनाच्या समाधानासाठी. पाऊस धुवांधार
नव्हताच जुमानीत छत्रीची लटपटती दुबळी कुडी.
दोघांची पावले संथ तरीही समोरच्या फूटपाथकडे.

आता दोघेही पोचलेली पलीकडे रस्ता ओलांडून.
फूटपाथवरच्या दुकानाच्या वळचणीखाली तो उभा
तिच्या सोबत. वादळावर मात केलेल्या गलबतासारखा.
पुढे आलेले छप्पर शेषाच्या फण्यासारखे त्यांच्या डोक्यावर.

मुंबई
१२–८–७६

## प्रारंभ

मी रहातो बोलत शब्दांच्या श्रावणसरी करून
केवळ तुझ्यासाठी : तुला हवे मी तसे बोललेले म्हणून;
माझे शब्द मला ऐकू येतात; दिसू लागतात
काचेतून पलिकडे दिसणाऱ्या पावसासारखे न भिजवणारे.

आल्बममधले जुने फोटो चाळताना एकटी बसून
जशी हरवतेस तू न दिसणाऱ्या पावसात :
हिरव्या झुलणाऱ्या फांद्या ओंजळीत जमवतात थेंब
आणि झऱ्यांभोवती दाटून येते हवीहवीशी गोड उदासी.

अगदी तशीच हरवतेस मी एक एक वाक्य उलटताना :
तुला ऐकू येऊ लागतो झाडांत हिरवागर्द होणारा पाऊस;
दिसू लागतो पोपटी कुरणावरून भिजत उडणारा शुभ्र पक्षी
आणि तू निघतेस अनवाणी, ओल्या मऊ लाल वाटेवरून.

मलाही निघावेच लागते तुझ्या सोबतीने या प्रवासाला;
मलाही जमवावी लागतात हिरव्या ओंजळीत पिवळी फूलपाखरे;
हरवलेला विश्वास मिठी घालतो मातीचा ओला गर्द वास होऊन.
वाटू लागते जगावेसे पुन्हा तसे...अगदी पुन्हा तसे.

माझे शब्द खरे होते ? खोटे होते ? काय म्हणू ?
पण शब्द माझ्याहून शहाणे होते इतके खरे;
जगावेसे वाटावे एवढे एकच अखेरचे सत्य :
तेवढेच मरणाच्या हातून निसटणारे अंतिम दान.

बोलता बोलता मीच हळूहळू होऊ लागतो खरा;
मी गुणगुणू लागतो अभावितपणे एक गाणे;
जसा पाऊस येण्याआधी येतो पाखरांना त्याचा वास
तशी मी जगण्याआधी लागते शब्दांना जगण्याची चाहूल.

मी रहातो बोलतः माझे शब्द गर्द पाऊस,
माझे शब्द ओल्या उन्हातला फूलपाखरांचा झिम्मा;
तू ऐकत असतेस तुझ्यामाझ्यापलीकडे जाऊन;
माझे जगणे होते एका गाण्याचा हळुवार प्रारंभ.

मुंबई
२४-८-७६

# चित्र

सांजलाटांत नाहले झाले खडक जांभळे,
पक्षी पांढरे वाळूत जीव भारून थांबले.

जांभ्या डोंगरावरती पडे ढगांची सावली,
मंद वाऱ्याची मलमल पाण्यावर विसावली.

स्मरणात जागा व्हावा तसा पाखराचा सूर,
गर्द मोर आकारतो संथ लयीतला धूर.

झाडीपल्याड गावात येती उमलून दिवे,
ओथंबल्या फांदीवर झुकू लागले काजवे.

ओला केशरी मधाचा चंद्र हळू आला वरी,
दूर काळीभोर होडी तोल तंद्रीत सावरी.

अनोळखी पावलांच्या खुणा मऊ वाळूतल्या
स्वत:लाच नकळत ओल्या चांदीने भरल्या.

मुंबई
२९–९–७६

## थोतांड

थोतांड खपविण्यासाठी
थोर उभे पंडिततांडे :
वांझोट्या बौद्धिकतेचे
सजवून कागदी मांडे.

शब्दांच्या गुंत्यामध्ये
संदर्भउवांची दाटी;
शेन्यांचा शेंदुर यांच्या
मर्जीतिल दगडांसाठी.

ठरवितात कविता कुठली
बडवुनिया बाष्कळ घंटा,
नाटकी निरर्थक भाषा
हो भूषण यांच्या कंठा.

केवढे भाग्य की कविता
थांबली न कुबड्यांसाठी :
जाणते ओढ रुजण्याची
ही पाउसओली माती.

मुंबई
२७–२–७८

## सोनचाफ्याची सकाळ

हळुवार उभे झाड सोनकोवळ्या उन्हात :
जसा पक्षीच हिरवा लाल मातीच्या मनात.

सोने रुजू रुजू आले गर्द भरल्या तळ्यात,
पालवीत पाखरांच्या सूर मावेना गळ्यात.

रंगयात्रेला निघाली फूलपाखरे मोकळी,
रेशमाच्या झुळुकीने झुले स्वतःशी डहाळी.

शुभ्र लकेरच तसा एक चौफुला उडतो :
जरा अल्लड तरंगे, जरा झुकून बुडतो.

साळींतल्या आरशांचे चकाकते ओलेपण,
निळ्या अद्‌भुताचा पक्षी झंकारतो स्वरांविण.

सोनकोवळ्या उन्हात सोनचाफ्याची सकाळ,
तळे गर्द गर्द झाले : आत उतरे आभाळ.

मुंबई
२०–४–७८

# दूर दूर जाताना

दूर दूर जाताना जवळपणा आज नवा,
पान पान गळताना प्राणातुन साज नवा.

दूर दूर जाताना बुजले संकेत, खुणा :
आशय नाहीच तिथे शब्द कुठे अधिकउणा ?

आज हवा थरथरते फूलपाखरूच जसे,
लाललाल कौलांवर सोन्याचे ऊन हसे.

झाडीच्या तंद्रीतुन पक्ष्यांचे वेट उडे :
झुंबरुनी वलयांना पाण्याला थेट भिडे.

न्हालेले नभ उमटे नितळ निळ्या या जळात,
नसुनी पाऊस कसा भिजलो मी चिंब आत ?

मुंबई
२१–५–७८

# इथल्या साऱ्या देवळांतून

जळल्या झोपड्या आमच्या लेखी
अक्षरेच केवळ असतात,
लुटलेली घरे फक्त
छापलेल्या चित्रांत दिसतात.

फोडलेल्या किंकाळ्यांना
बातमीचेच असते मोल,
गढूळलेल्या डबक्याहून
जाणीव कधीच नसते खोल.

कितीक पिढ्या झोपी गेल्या
पुस्तकांतल्या घोषणांवर,
डोळे मिटून पोसत आल्या
बेशरम शोषणावर.

वांझोट्याच वेदना :
संस्कृती व्याली खडे,
इथल्या साऱ्या देवळांतून
धर्म यांचे झाले मढे.

मुंबई
५–९–७८

## झाकण

माणसे
काळोख होण्याची
वाट बघतात.

मग आपल्याच
मढ्यावर
झोपेचे पांघरूण
ओढतात.

कोंडलेल्या लव्हीसारखी
स्वप्ने तुंबतात.

रात्रीच्या गटारावर
प्रकाशाचे झाकण पडते,
मरू घातल्या म्हातारीचे
एक कोंबडे ओरडते.

मग माणसे मढ्याचे
दात घासतात
सवयीच्या ब्रशाने
उमेदीची
पेस्ट चोळून.

मग मढे
बोलू लागते,
मग मढे
चालू लागते.

मग मढे
विधीसाठी
आपली चड्डी
खोलू लागते.

मग मढे
भरधाव
धावू लागते

धाव धाव
धावू लागते,
काव काव
कावू लागते.

मिळव मिळव
मिळवू लागते,
पिळव पिळव
पिळवू लागते.

रात्रीच्या गटारावरचे
प्रकाशाचे झाकण
हळू हळू
उघडू लागते.

मुंबई
५–१२–७८

# ग्रंथ

ग्रंथ कोंडून ठेवू नका कपाटात सुरक्षित,
नको पहाऱ्यावर तुसड्या चेहऱ्यांचे रखवालदार,
जिथे ग्रंथ कोंडले जातात तिथे राष्ट्र कोंडले जाते :
कपाटांच्या कबरीत गाडले जातात विचारांचे मुडदे.

प्रत्येक ग्रंथ म्हणजे असते एक निमंत्रण :
कधी झपूर्झाचे, कधी हिरव्या हिरव्या गार गालिच्यांचे...
निळ्या आभाळात उडू लागतात शुभ्र विचारांचे पक्षी
तेव्हा उगवते इंद्रधनुष्य मनाच्या क्षितिजावर.

ग्रंथपाल हसतो तेव्हा ग्रंथालय होते एक बाग
न कोमेजणाऱ्या असंख्य फुलांनी बहरलेली,
ग्रंथ सुखाने फिरू लागतात हिरव्या कुरणावरून,
हाक घालतात लहान मुलांसारखे उचलून घेण्यासाठी.

जेव्हा हुकूमशाही आवळते गळ्याभोवती फास
तेव्हा ग्रंथच पेरतात तिच्या ठिकऱ्या करणारे सुरुंग,
शोषणाच्या अंधारात ग्रंथच होतात नवे सूर्य,
जुलमाचे समुद्र ग्रंथ पिऊन टाकतात अगस्तीसारखे.

ग्रंथालयातले ग्रंथ भेटले पाहिजेत माणसांसारखे
मोकळ्या हवेत नव्या नव्या जाणिवांच्या.
ग्रंथांच्या स्पर्शाने पायांतल्या बेड्या तुटोत,
ग्रंथांच्या स्पर्शाने भिंतींचे आकाश बनो.

मुंबई
१९७८

# प्रवचन

आध्यात्मिक प्रवचन चालू असताना
त्याने जांभई गिळली समजूतदार संयमाने;
वाऱ्याने झुळझुळ फिरवली बोटे त्याच्या केसांतून :
कोवळ्या गुदगुल्यांनी तो शहारला क्षणभर
सरींनी झाड शहारावे तसा हळुवार.

सगळे मग्न असताना आपणच असे
एकाग्रता नसलेले : त्याने दटावून पाहिले
आपल्या खट्याळ मनाला : पण खिडकीतून
बाहेर उन्हाच्या वळणापाशी थुयथुयणारे
त्याचे मन काही केल्या मागे फिरेना.

हिरव्यामऊ गवतावर एक फूलपाखरू
घालीत होते रांगोळी पिवळ्या ठिपक्यांची,
जांभळा फ्रॉक घातलेली एक अल्लड मुलगी
गिरक्या घेत होती बदामाच्या झाडाखाली,
सावल्या होत्या काळ्याभोर संथ संथ रवंथ करीत.

प्रवचनातील वाक्ये त्याला जाणवली
लोखंडी गज होताना बळकट पिंजऱ्याचे;
हा एक पिंजरा : असे कितीतरी, संघटित,
पावलापावलावर, न दिसताही कोंडणारे,
सवयीने सांस्कृतिक संचित बनलेले...

त्याने डोळे मिटले आणि गिळून टाकली
पुन्हा आलेली जांभई समजूतदार संयमाने.

मुंबई
९-१-७९

## कावळे

कोपऱ्यात स्मशानाच्या एक झाड त्याने पाहिले
फुलांनी भरून आलेले : हिरव्या ओंजळीत
जशी फूलपाखरे उडूउडू पहाणारी उत्सुक;
त्याने नजर हलवली त्यांच्यावरची क्षणात

औचित्य तुडवल्याची शरम दाटून मनात :
दुःखाच्या गावात अत्तर माखून फिरावे तसे वाटले;
त्याने डोळे खिळवले सुरू असलेल्या मरणविधींवर,
ताटीला जखडलेल्यावर, अनावर हुंदक्यांवर...

काय नाते कुणाचे या दुःखाशी ? सारे उपचार
कर्तव्यपूर्तीचे केवळ कृतक समाधान भोगण्यासाठी ?
माणसे आपापसात बोलत होती सवयीने,
एकाने उघडले वर्तमानपत्र : इतरांचे लक्ष मथळ्यांवर.

मथळ्यांचे काळे कावळे आणि झाडावरची फुले
यांत फरक कोणता ? रडणाऱ्यांनाही येईल हळूहळू
कढत कॉफीचा वास ? माणूसपण हलवून सोडणारा
कुठे अनुभव ? फुलांत ? मथळ्यांत ? ताटीवर ?

मेंदूला मुंग्या आल्यागत तो सुन्न उभा राहिला
फुलझाडावर बसलेले मथळ्यांचे कावळे पहात.

मुंबई
३१–१–७९

## ख्रिस्त

प्रत्येकाला नव्यानेच शोधावा लागतो आपला ख्रिस्त,
उचलावा लागतो आपला क्रूस आपल्या खांद्यावर,
करुणेचे गाणे नसते जन्मत दगडविटांच्या देवळात
इथले धर्म संघटित हिंसेचेच सूक्ष्म आविष्कार.

तान्हुले कुशीत घेऊन अर्धनग्न भिकारीण जेव्हा
पहातो फूटपाथवर कडाक्याच्या थंडीत मध्यरात्री
तेव्हा दिसतो ख्रिस्त नव्याने, आपला क्रूस घेऊन
चाबकाचे फटके खात चालताना अनवाणी पायांनी.

ख्रिस्त दिसतो मला नव्याने जेव्हा बाबा आमटे
घेतात चुंबन माहरोग्याच्या हाताचे गुलाबाच्या फुलासारखे :
त्याला हात देण्यासाठी : आणि करतात त्याला उभा
दयेची भीक न मागता आत्मविश्वासाच्या पायावर.

जेव्हा उचलते मदर टेरेसा रस्त्यावरच्या भिकाऱ्याला,
त्याला न्हाऊखाऊ घालते आणि तो उच्चारतो अखेरचे शब्द :
"जगलो जनावरासारखा, पण मरतो आहे राजपुत्राप्रमाणे."
तेव्हा ऐकू येते मला कोणत्याही मंदिरात न झालेले प्रार्थनागीत.

सांप्रदायिकतेच्या पिंजऱ्यात बंदिस्त होत नसतात महात्मे :
ते चुकवतात पहारे पुरोहितशाहीचे, निसटतात ग्रंथांच्या कैदेतून.
प्रत्येकाला बरगड्या असतात, पण क्रूस असणारा एखादाच,
हात असणारे सारेच, पण फुले जगवणारा क्वचित दिसतो.

गुन्हेगार स्पर्धेच्या हिंस्र संस्कृतीत प्रत्येक क्षणी
क्रुसावर चढत असतो ख्रिस्त भर गर्दीत, दुर्लक्षित;

आपले खुनी हात लपवून ठेवा आपल्या यशस्वी खिशांत,
पाहू नका : ते दिसतील माखलेले खिस्ताच्या रक्ताने.

मुंबई
२१-११-७९

## अनुभव

गेंड्याच्या काळ्या तुकतुकीत कातडीसारखा
करकरीत रेनकोट त्याने चढवला,
संरक्षक टोपी घट्ट डोक्यावर,
गच्च गमबूट गुडघ्यापर्यंत झाकणारे.

मग तो बाहेर पडला योद्धाच जसा सज्ज
धुवांधार पावसाचा अनुभव घेण्यासाठी;
कड्यावरून धबधबा होता झेपावत,
झपाटलेल्या झाडांनी धरला होता ताल.

अनावर पावसाचा अनुभव
अंगावर चहूकडून कोसळला :
वाऱ्यामुळे त्याची गती तेवढी डुचमळली,
हातांचे पंजे, चेहरा फक्त ओला झाला.

मुंबई
२७-१२-७९

## मिटून

पुस्तक अर्धंच वाचून
मिटून टाकावं
तसं मिटून टाकावं लागतं
आयुष्य काही वेळा.

पुस्तक कोणी मिटलं ?
तू की मी ?
की दोघांनीही ?

कां मिटलं ?
वाचण्याआधी पुढचं
सगळं कळलं होतं म्हणून ?
वाचण्याची हिंमत नव्हती म्हणून ?

मिटलं तर मिटलं :
पण जे वाचलं होतं
ते आठवायचं कशासाठी ?

मोरसुद्धा
पंख मिटून घेतातच ना ?

मुंबई
२९-१-८०

REFBK-0024316
REFBK-0024316
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५०९
दा. क्र. २५७३७८
काव्य ५१४५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)